क्रमांक : १०२८१ /क-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : १३/०६/२०२३

**विषय :- या सचिवालयातील वर्ग-अ (राजपत्रित) व वर्ग-ब (राजपत्रित) अधिकारी यांनी कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून बायोमेट्रिक यंत्रणेवर उपस्थितीची नोंद करण्याबाबत...**

**संदर्भ :-१) या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक ५१२४/क-१, दि. ०८ मार्च, २०२३**
**२) या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक ७०२४/क-१, दि. २९ मार्च, २०२३**

**:: परिपत्रक ::**

या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी (वर्ग १ ते वर्ग ४) यांना उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये दिनांक ०३ एप्रिल, २०२३ रोजीपासून कार्यालयात येताना व कार्यालयातून जाताना उपस्थितीची नोंद बायोमेट्रिक यंत्रणेवर नोंदविणे अनिवार्य असल्याचे कळविण्यात आले होते. तथापि, बायोमेट्रीक यंत्रणेवर नोंदविण्यात आलेल्या उपस्थितीच्या अहवालाचे अवलोकन केले असता काही अधिकारी कार्यालयीन वेळेनंतर कार्यालयात उपस्थित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच काही अधिकारी हे केवळ एकदाच बायोमेट्रीक यंत्रणेवर उपस्थितीची नोंद करित असून काही अधिकारी बायोमेट्रीक यंत्रणेवर उपस्थितीची नोंदच करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

कार्यालयात येताना व कार्यालयातून जाताना उपस्थितीची नोंद बायोमेट्रीक यंत्रणेवर करणे अनिवार्य असल्याने यापुढे वर्ग-अ (राजपत्रित) व वर्ग-ब (राजपत्रित) अधिकारी यांनी कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपस्थित रहावे व बायोमेट्रीक यंत्रणेवर दोन्ही वेळा उपस्थितीची नोंद करावी.

आदेशानुसार
sd/-
**(सायली कांबळी)**
उप सचिव (विधी)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

१) मा. सचिव (१) (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
२) मा.सचिव (२) (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
४) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
५) सर्व मा.समिती प्रमुख यांचे कार्यालय.

६) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) क-२ संगणक कक्ष

८) निवडनस्ती.